माहिला पोलीस उपनिरीक्षक व पुरुष पोलीस उप निरीक्षक हे संवर्ग एकत्रित केल्यानंतर त्यांची आपापसातील सेवाज्येष्ठता निश्चित करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे .

महाराष्ट्र शासन
गृह विभाग

शासन निर्णय, क्रमांक पीएमएन ०१०५/प्र.क्र. ७५९/पोल- ५ ब,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२, दिनांक: २४ जून, २००९

<u>वाचा :-</u> शासन निर्णय, गृह विभाग, क्र. टीईएक्स ०३९७/सीआर-४६१/पोल- ५ अ, दिनांक १८ जुलै, १९९८

<u>प्रस्तावना :-</u> महाराष्ट्र शासनाने पोलीस विभागात महिला पोलीस उपनिरिक्षक व पुरुष पोलीस उपनिरीक्षक यांचा एकत्रित संवर्ग करण्याबाबतचा निर्णय घेऊन त्याबाबतचा शासन निर्णय क्रमांक: टीईएक्स ०३९७/सीआर-४६१/पोल-५ अ, दिनांक १८ जुलै, १९९८ रोजी निर्गमित करण्यात आला. तथापि, एकत्रित करावयाच्या दोन संवर्गाची सेवाज्येष्ठता कशाप्रकारे निश्चित करावी याबाबत कोणतीही मार्गदर्शक तत्वे ठरविण्यात आली नव्हती. पुरुष व महिला उप निरीक्षक यांच्या सेवाज्येष्ठतेबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल याचिका क्रमांक २२८२/०७ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिनांक १९ एप्रिल, २००७ रोजी निर्णय दिला की, या दोन संवर्गाच्या एकत्रिकरणानंतर सन १९७७-७९ पुढील तुकडीत (बॅचमध्ये) नियुक्त झाले [illegible] उमेदवारांच्या बाबतीत त्यांची आपापसातील सेवाज्येष्ठता ठरविण्यासाठी शासनाने मार्ग[illegible] निश्चित करावीत. दोन संवर्ग एकत्रित करताना महाराष्ट्र शासन विरुध्द चंद्रकांत [illegible] (१९८१) ४SCC १३० मधील सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेली तत्वे विचारा[illegible] निर्देशाही

मा. उच्च न्यायालयाने दिले आहेत. या तत्वानुसार दोन संवर्ग एकत्रित करताना खालील बाबी विचारात घेणे आवश्यक आहे.

अ) पदांचे स्वरुप व त्यांची कर्तव्ये

ब) सदर पदांवरील व्यक्तींचे अधिकार व त्यांच्या जबाबदाऱ्या

क) सदर पदांवरील नियुक्तीसाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता , व

ड) सदर पदांचे वेतन

उपरोक्त बाबींचा विचार करुन शासनाने आता पुढील प्रमाणे निर्णय घेतला आहे

शासन निर्णय :- राज्य पोलीस दलातील महिला पोलीस उपनिरीक्षक व पुरुष पोलीस उपनिरीक्षक या दोन्ही संवर्गाच्या एकत्रिकरणानंतर त्यांची आपापसातील सेवाज्येष्ठता ठरविण्यासाठी खालीलप्रमाणे तत्वे निश्चित करण्यात येत आहेत :-

१) सन १९७७ पूर्वीची पोलीस उपनिरीक्षक पदाची सेवाज्येष्ठता अबाधित ठेवण्यात यावी.

२) महिला पोलीस उपनिरीक्षक व पुरुष पोलीस उपनिरीक्षक या दोन्ही संवर्गाचे स्वरुप व कर्तव्ये सर्वसाधारणपणे समान आहेत. या दोन्ही पदांचे अधिकार व जबाबदाऱ्या एकच आहेत. दोन्ही पदांसाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता एकच ठरविण्यात आली आहे व या दोन्ही पदांची वेतनश्रेणी एकच आहे या बाबी लक्षात घेता सन १९७७ नंतर पुरुष पोलीस उपनिरीक्षक व महिला पोलीस उपनिरीक्षक या दोन्ही संवर्गाच्या एकत्रिकरणानंतर त्याची आपापसातील सेवाज्येष्ठता ही त्यांच्या प्रथम नियुक्तीच्या दिनांकापासून किंवा नेमणूकीनंतर प्रशिक्षणासाठी उपस्थित झाल्याच्या दिनांकापासून (Date of Appointment / Date of resume for training) निश्चित करण्यात यावी.

३) जर महिला पोलीस उपनिरीक्षक व पुरुष पोलीस उपनिरीक्षक यांचा नियुक्तीचा/ प्रशिक्षणासाठी उपस्थित झाल्याचा दिनांक समान असल्यास त्यांच्या जन्म दिनांकाच्या आधारे सेवाज्येष्ठता निश्चित करण्यात यावी.

४) प्रशिक्षणार्थी पोलीस उपनिरीक्षकांच्या बाबतीत त्यांची आपापसातील सेवाज्येष्ठता प्रशिक्षणातील गुणवत्ता विचारात घेऊन पुर्ननिश्चित करण्यात यावी.

५) सन १९८१ पासून महिला व पुरुष या दोन्ही संवर्गातील पोलीस उप निरीक्षकांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत एकत्रित मागणीपत्रानुसार शिफारस करण्यात येत असल्याने व त्यांचा प्रशिक्षण कालावधी एकच असल्याने सन १९८१ नंतर पोलीस उपनिरीक्षकांच्या सेवाज्येष्ठतेमध्ये कोणताही बदल करण्यात येऊ नयेत.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर देण्यात आला असून संगणक सांकेतांक २००९०६२४१४३२१३००१ याप्रमाणे आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(सदानंद जाधव)

उप सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग

प्रति,

१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
३) महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
४) महासंचालक, पोलीस गृह निर्माण महामंडळ, मुंबई
५) अपर पोलीस महासंचालक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग,पुणे
६) आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग

७) विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशिक्षण व खास पथके) महाराष्ट्र राज्य, मुंबई
८) विशेष पोलीस महानिरीक्षक (पीसीआर) महाराष्ट्र राज्य, मुंबई.
९) विशेष पोलीस महानिरीक्षक (वाहतूक) महाराष्ट्र राज्य, मुंबई
१०) सर्व पोलीस आयुक्त (रेल्वेसह)
११) सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक
१२) पोलीस उपमहानिरीक्षक (रेल्वे) महाराष्ट्र राज्य, मुंबई
१३) सर्व पोलीस अधीक्षक (रेल्वेसह)
१४) संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी नाशिक
१५) सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालय
१६) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १/२ महाराष्ट्र, मुंबई /नागपूर
१७) महालेखापाल (लेखा परिक्षा) १/२ , मुंबई / नागपूर
१८) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१९) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
२०) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
२१) मा. मंत्री (गृह) यांचे सचिव
२२) मा. राज्यमंत्री (गृह) (ग्रामिण/शहरे) यांचे स्वीय सहाय्यक
२३) अपर मुख्य सचिव (गृह) यांचे स्वीय सहाय्यक
२४) प्रधान सचिव (विशेष) यांचे स्वीय सहाय्यक
२५) प्रधान सचिव (गृह) (अ. व सु.) यांचे स्वीय सहाय्यक
२६) अवर सचिव / पोल- ५ अ, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
२७) कक्ष अधिकारी, पोल १ अ
२८) निवडनस्ती.